# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग
## पत्रकारिता प्रगत अभ्यासक्रम प्रवेशप्रक्रिया (२०२४-२५)

(पूर्वीचा पदव्युत्तर पत्रकारिता पदविका अभ्यासक्रम)

Since this course is offered only in Marathi, the information is given in Marathi.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागातील हा अभ्यासक्रम पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सहकार्याने चालवण्यात येतो. संपूर्ण अभ्यासक्रम केवळ मराठीतून चालतो.

पदव्युत्तर पत्रकारिता पदविका या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करण्यासंबंधीची सर्व माहिती पुढील दुव्यावर उपलब्ध आहे.
https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx

कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधारक या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेला जे बसले आहेत, तेदेखील प्रवेशासाठी अर्ज करू शकतात.

या अभ्यासक्रमाला केवळ प्रवेशपरीक्षेच्या आधारेच प्रवेश देण्यात येतो. प्रवेशपरीक्षेचा तपशील पुढीलप्रमाणेः

**प्रवेशपरीक्षा फक्त ऑफलाइन** स्वरूपात, म्हणजे संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागात **लेखी पद्धतीने** होईल.

| **प्रवेशपरीक्षेचे ठिकाण** | **दिनांक** | **वेळ** |
|---|---|---|
| **संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग**<br>रानडे इन्स्टिट्यूट बिल्डींग, फर्गसन महाविद्यालय रस्ता<br>हॉटेल रूपाली समोर, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४<br>संपर्कः (०२०) २५६५४०६९, श्री. संदीप नरडेले ९९३०३४१३३३ | बुधवार दि. ३ जुलै, २०२४ | स. ११ ते दु. २ |

| **प्रवेशपरीक्षा प्रश्नपत्रिका स्वरूप (एकूण गुण १००)** | |
|---|---|
| भाग अ (५० गुण) | भाग आ (५० गुण) |
| १) एका शब्दात उत्तरे द्या. (१५)<br>२) जोड्या जुळवा. (५)<br>३) संदर्भ स्पष्ट करा. (५)<br>४) लघुरूपांचा विस्तार करा. (५)<br>५) इंग्रजीतून मराठीत भाषांतर करा. (५)<br>६) मराठीतून इंग्रजीत भाषांतर करा. (५)<br>७) समानार्थी, विरूद्धार्थी शब्द सांगा. (५)<br>८) विरामचिन्हांचा योग्य वापर करा. (५) | १) निबंध लिहा. (२०)<br>२) टिपा लिहा. (२०)<br>३) दिलेल्या उताऱ्याच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा. (१०) |
| सूचनाः वरीलपैकी भाग अ (१, २, ३) व भाग आ (१, २) या घटकांतील प्रश्न प्रामुख्याने माध्यमे व पत्रकारिता, तसेच गेल्या वर्षभरात महाराष्ट्र, देश व आंतरराष्ट्रीय या स्तरांवर विविध क्षेत्रांत घडलेल्या घटना यांच्या संदर्भात असतील. | |

डॉ. संजय विष्णू तांबट,
विभागप्रमुख